# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

**३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.**

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

तार - EDUTECH E-mail : desk10@dte.org.in Internet : www.dte.org.in

**अधिसूचना**

क्रमांक : १०/पदविका/अधिसूचना/२००९/८१०

दिनांक : २३/११/२००९

**शैक्षणिक वर्ष २०१०-२०११ साठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अखत्यारित असलेल्या पदविका अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था सुरु करणे, सध्या सुरु असलेल्या तंत्रनिकेतनामध्ये नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, प्रवेश क्षमतेत वाढ / घट करणे, ट्युशन फी वेवर स्कीम लागू करणे, संस्था बंद करणे, संस्था स्थलांतर, संस्थेच्या नावात बदल इत्यादीबाबत प्रस्ताव मागविण्याबाबत.**

संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडून शैक्षणिक वर्ष २०१०-२०११ साठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषदेच्या अखत्यारीत असलेल्या पदविका अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था सुरु करणे, सध्या सुरु असलेल्या तंत्रनिकेतनामध्ये नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, प्रवेश क्षमतेत वाढ / घट करणे, ट्युशन फी वेवर स्कीम लागू करणे, संस्था बंद करणे, संस्था स्थलांतर, संस्थेच्या नावात बदल इत्यादीबाबत प्रस्ताव मागविण्यांत येत आहेत. त्याकरीता इच्छूक ट्रस्ट / संस्थांनी विहित नमुन्यात अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अर्जाचा नमुना संचालनालयाचे संकेत स्थळावर www.dte.org.in/download येथे व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषदेची मानके www.aicte.ernet.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत.

अर्ज दाखल करु इच्छिणाऱ्या संस्थांनी अर्जाची मूळ प्रत संबंधित विभागीय कार्यालयाकडे दाखल करुन मुळ अर्जाच्या छायांकीत प्रती अनुक्रमे १. तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई २. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुख्य कार्यालय / संबंधित विभागीय कार्यालय व ३. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषद, पश्चिम विभागीय कार्यालय, चर्चगेट, मुंबई येथे कागदपत्रांच्या छायांकीत प्रतीसह दाखल करणे आवश्यक आहे.

- अर्जासोबत धनाकर्ष स्वरुपात सादर करावयाचे शुल्क (ना-परतावा) खालीलप्रमाणेः-

| | | |
|---|---|---|
| १. | अर्ज दाखल करतांना भरावयाचे अर्ज शुल्क<br>(धनाकर्ष संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई यांच्या नावे मुंबई येथे देय) | **रुपये ५,०००/-** |
| २. | वाढीव मुदतीत अर्ज दाखल करण्यासाठी लागू असलेले एकत्रित शुल्क (विलंब शुल्कासह)<br>(धनाकर्ष संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई यांच्या नावे मुंबई येथे देय) | **रुपये १०,०००/-** |
| ३. | महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांचे ना-हरकत प्रमाणपत्राबाबतचे शुल्क | **रुपये १०,०००/-**** |
| ४. | महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांचे ना-हरकत प्रमाणपत्राबाबतचे विलंब शुल्कासह शुल्क | **रुपये १३,०००/-**** |

**मुंबई विभागासाठी धनाकर्ष सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्या नावे मुंबई येथे देय तर इतर विभागासाठी धनाकर्ष उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, संबंधित विभागीय कार्यालय यांच्या नावे संबंधित विभागीय कार्यालय येथे देय.

- अर्ज सादर करण्याबाबतचे वेळापत्रक खालीलप्रमाणेः-

| अ.क्र. | तपशिल | कालावधी |
|---|---|---|
| १. | शैक्षणिक वर्ष २०१०-२०११ साठी पदविका अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था सुरु करणे, सध्या कार्यरत संस्थांमध्ये नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ / घट करणे, संस्था बंद करणे, संस्था स्थलांतर, संस्थेच्या नावात बदल इत्यादीबाबत अर्ज व अर्जासोबत जोडावयाच्या प्रमाणपत्र, दाखले व सहपत्रांची यादी संचालनालयाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करणे | दिनांक २४.११.२००९ ते दिनांक १९.१२.२००९ |
| २. | ट्रस्ट / संस्थांनी संबंधित विभागीय कार्यालय / संचालनालय / महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई / विभागीय कार्यालय, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ / अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषद, पश्चिम विभागीय कार्यालय, मुबई येथे आवश्यक कागदपत्रासंह अर्ज दाखल करणे. | दिनांक २४.११.२००९ ते दिनांक १९.१२.२००९ |
| ३. | अर्ज विलंब शुल्कासह सादर करण्याचा कालावधी | दिनांक २१.१२.२००९ ते दिनांक २९.१२.२००९ |

- तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयांची माहिती.

| अ.क्र. | विभागीय कार्यालयाचे नांव व पत्ता | दूरध्वनी / फॅक्स क्रमांक |
|---|---|---|
| १. | सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, जागतिक बँक प्रकल्प इमारत, शासकीय तंत्रनिकेतन परीसर, ४९, अलियावर जंग मार्ग, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१. | दूरध्वनी क्रमांक : (०२२) २६४७४८९२, २६४७४६४९<br>फॅक्स : (०२२) २६४७१६१९ |
| २. | सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, ४१२-ई, बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे-४११०१६. | दूरध्वनी क्रमांक : (०२०) २५६५७१७६<br>फॅक्स : (०२०) २५६५६२३४ |
| ३. | सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, शासकीय तंत्रनिकेतन परीसर, पत्र पेटी क्रमांक २१७, सामनगांव रोड, नाशिक-४२२१०१. | दूरध्वनी क्रमांक : (०२५३) २४६१४७९<br>फॅक्स : (०२५३) २४५५३०१ |
| ४. | सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, शासकीय तंत्रनिकेतनाजवळ, पत्र पेटी क्रमांक ११९,उस्मानपुरा, औरंगाबाद-४३१००१. | दूरध्वनी क्रमांक : (०२४०) २३३४२१६<br>फॅक्स : (०२४०) २३५६८२० |
| ५. | सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, शासकीय तंत्रनिकेतन परीसर, व्ही.एम.व्ही. मार्ग, गाडगे नगर, अमरावती-४४४६०३. | दूरध्वनी क्रमांक : (०७२१) २५७२५७७<br>फॅक्स : (०७२१) २५५१३८८ |
| ६. | सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, शासकीय तंत्रनिकेतन परीसर, सदर बाजार, नागपूर-४४०००१. | दूरध्वनी क्रमांक : (०७१२) २५६५१४३<br>फॅक्स : (०७१२) २५६१६६३ |

* महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या विभागीय कार्यालयांची माहिती. (अधिक माहितीसाठी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचे संकेत स्थळ www.msbte.com पहावे.)

| अ. क्र. | विभागीय कार्यालयाचे नांव व पत्ता | विभागांतर्गत येणारे जिल्हे | दूरध्वनी / फॅक्स क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, शासकीय तंत्रनिकेतन परीसर, ४९, अलियावर जंग मार्ग, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१. | मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड | दूरध्वनी क्रमांक : (०२२) २६४७१२५५ फॅक्स : (०२२) २६४७३९८० |
| २. | उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, पहिला मजला, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय इमारत, ४१२-ई, बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे-४११०१६. | रत्नागिरी, सिंधूदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर | दूरध्वनी क्रमांक : (०२०) २५६५६९९४, २५६६०३१९ फॅक्स : (०२०) २५६५२३०८ |
| ३. | उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, पहिला मजला, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय इमारत, स्टेशन रोड, उस्मानपुरा, औरंगाबाद-४३१००५. | औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, लातूर, उस्मानाबाद, नांदेड, बीड, नाशिक, धुळे, जळगांव, अहमदनगर, नंदूरबार | दूरध्वनी क्रमांक : (०२४०) २३३१२७३, २३३४०२५ फॅक्स : (०२२) २३४९६६९ |
| ४. | उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, पहिला मजला, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय इमारत, शासकीय तंत्रनिकेतन परीसर, सदर बाजार, नागपूर-४४०००१. | नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, साकोली, गोंदीया, भंडारा, वर्धा, यवतमाळ, अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा | दूरध्वनी क्रमांक : (०७१२) २५६२२२३, २५२२८३६ फॅक्स : (०७१२) २५६०३५० |

**सूचना :-**

* नवीन संस्था सुरु करणे, कार्यरत संस्थेत नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, प्रवेश क्षमतेत बदल करणे याबाबतचा निर्णय, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने तयार केलेल्या सम्यक योजनेच्या (Prospective Plan) अधीन राहून घेण्यांत येईल.
* अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषदेने विहीत केलेल्या मान्यता प्रक्रीया पुस्तिकेमध्ये (Approval Process Handbook) नजीकच्या काळात काही बदल / सुधारणा झाल्यास सुधारीत मान्यता प्रक्रीयेनुसार कार्यवाही करण्यांत येईल.
* **शैक्षणिक वर्ष २००९-२०१० मध्ये ज्या अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र / एच.एम.सी.टी. पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांच्या प्रवेश क्षमतेमध्ये घट करण्यांत आलेली आहे, अशा संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०१०-२०११ मध्ये प्रवेश क्षमता पुनर्स्थापित करणे / बदलासाठी प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.**

- ज्या संस्था एन. बी. ए. नामांकनासाठी अर्ज करण्यासाठी पात्र आहेत, अशा संस्थानी एन.बी.ए. नामांकनासाठी अर्ज केलेला असेल / नामांकन प्राप्त केलेले असेल तरच प्रवेश क्षमता बदलासाठीच्या प्रस्तावावर विचार करण्यात येईल.
- ज्या संस्था एन. बी. ए. नामांकनासाठी पात्र नाही त्या संस्थांचे परिक्षण ''की परफॉरमन्स इंडिकेटर'' च्या आधारे करण्यात येईल व ज्या संस्थांची प्रगती समाधानकारक आहे अशा संस्थाचा प्रवेश क्षमता बदलासाठी विचार केला जाईल.
- **मान्यता प्रक्रियेबाबत विविध सूचना वेळोवेळी संचालनालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यांत येतील, याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.**
- **प्राप्त प्रस्तावांच्या छाननीसाठी संस्थांनी संचालनालयात उपस्थित राहण्याबाबतचे वेळापत्रक दिनांक ०५.०१.२०१० नंतर संचालनालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यांत येईल.**
- **सदर जाहिरातीच्या अनुषंगाने वरील विषयाबाबत प्रस्ताव सादर करणाऱ्या संस्थांना कळविण्यांत येते कीं, संस्थेने सादर केलेल्या प्रस्तावामध्ये काही त्रुटी आढळून आल्यास सदर त्रुटींची पुर्ततेबाबतची कागदपत्रे दिनांक १०.०२.२०१० पर्यंतच संचालनालयामार्फत स्विकारण्यांत येतील, तद्‌नंतर सादर करण्यांत येणाऱ्या त्रुटी पुर्ततेबाबतच्या कागदपत्रांचा विचार करण्यांत येणार नाही.**
- **सदर जाहिरातीच्या अनुषंगाने वरील विषयाबाबत सादर करण्यांत येणारे प्रस्ताव शैक्षणिक वर्ष २०१०-२०११ साठीच वैध राहतील.**
- औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाची नवीन संस्था सुरु करण्यासाठी संस्थांनी अर्ज सादर करु नये.
- ज्या औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थांची प्रवेश क्षमता ६० आहे, अशा संस्थांनी प्रवेश क्षमता वाढीसाठी प्रस्ताव सादर करु नये.
- संस्था बंद करणे, अभ्यासक्रम बंद करणे, यासाठी संस्थांनी ना-हरकत प्रमाणपत्र मिळण्यासाठी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाकडे प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.
- वेगवेगळया पदविका अभ्यासक्रमासाठी स्वतंत्र अर्ज सादर करणे आवश्यक आहे. (उदा. अभियांत्रिकी / एच.एम.सी.टी. इत्यादी.)

**( डॉ. सु. का. महाजन )**
प्र. संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.